# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी—४ महाराष्ट्र अधिनियम, १९९४(१९९४ चा महा. ३५) या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सत्र २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

(विद्या विभाग)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली — ४४२६०५ फोन:०७१३२ — २१६५५४, २२३१०४,२२३३२३

जा. क्र/गों.वि/वि.वि/९१५/२०२१ दि. २५/०२/२०२१

# परिपत्रक

**विषय :— ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस ''मराठी भाषा गौरव दिन'' म्हणून साजरा करणेबाबत.**

**संदर्भ : क्रमांक : मभादि— ०४२१/प्र.क्र.०२/मवि—१/२०८९ दिनांक १८/०२/२०२१**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असुन, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणुन श्री. वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी, हा जन्मदिवस ''मराठी भाषा गौरव दिन'' म्हणून साजरा केला जातो. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांनी दिलेल्या प्रपत्रानुसार कोव्हिड—१९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या वेळोवेळी सुचनांप्रमाणे सर्व प्रतिबंधक उपायांचे पालन करुन ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस ''मराठी भाषा गौरव दिन'' म्हणून आपल्या महाविद्यालयामध्ये साजरा करुन कार्यक्रमाचा संक्षिप्त अहवाल छायाचित्रासहीत उलटटपाली विद्यापीठास सादर करण्यात यावा.

25/02/2021

(डॉ.अनिल चिताडे )
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सहपत्र :— संदर्भीय पत्र संलग्नित.**

गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
विद्या विभाग
आवक क्र. 683 दि. 24/2/2021
जावक क्र. 104 दि. 24/2/2021

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिव कार्यालय
आवक क्र. ...... दि. ......
जावक क्र. 2168 दि. 24/2/21

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in
E-mail : mavl.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५६५१२, २६१३०६२७, २६१२४६३९
फोन नं.०२०/२६१११११५३

क्रमांक :मभादि-०४२१/प्र.क्र.०२/मवि-४/ 2085
दिनांक १८.०२.२०२१
18 FEB 2021

प्रति,

१.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
२.मा.कुलसचिव,
सर्व अकृषी /अभिमत / स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे,

**विषय - ज्येष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन " म्हणून साजरा करणेबाबत.**

संदर्भ : मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र. मभादि-२०२१/ प्र.क्र.५ / भाषा-३, दि.११.०२.२०२१.

उपरोक्त विषयी संदर्भीय मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक सोबत जोडले आहे.कृपया अवलोकन व्हावे.ज्येष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन " म्हणून साजरा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

संदर्भिय सुचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या वेळोवेळी सुचनांप्रमाणे सर्व प्रतिबंधक उपायांचे पालन करुन ज्येष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि.२७ फेब्रुवारी हा जन्मदिवस " मराठी भाषा गौरव दिन " साजरा करण्याबाबत आपल्या अधिनस्त शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित महाविद्यालये / मॉडेल डिग्री महाविद्यालये / वसतिगृहे व परीसंस्था यांना कळविण्यात यावे व एकत्रित अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

Shinde

(डॉ.अजिता शिंदे)
कनिष्ठ प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय , उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

Dr Junghare DR(Academic)
issue notification to all affiliated colleges
22/2

प्रत : मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ यांना माहितीसाठी

ज्येष्ठ कवी वि.वा शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
**शासन परिपत्रक क्रमांकः मभादि-२०२१/प्र.क्र.५/भाषा-३,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक: ११ फेब्रुवारी, २०२१**

वाचा :- मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.मभादि-१०१२/प्र.क्र.८८/२०१२/भाषा-३, दिनांक २१ जानेवारी, २०१३.

परिपत्रक :-

वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी हा जन्मदिन "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याच्या सूचना यापूर्वी दिनांक २१ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयास अनुसरुन राज्यातील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुख यांना शनिवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२१ रोजी पुढील विविध उपक्रम आयोजित करुन समारंभपूर्वक "मराठी भाषा गौरव दिन" सोहळा साजरा करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

"मराठी भाषा गौरव दिन" हा कार्यक्रम मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या मुख्य धोरणास अनुसरून "मराठी वाचन प्रेरणा दिन" "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" या अन्य मराठी भाषा प्रचार प्रसार कार्यक्रमाबरोबर साजरा करण्यात येत असला तरी सध्याच्या कोवीड १९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून जास्तीत जास्त कार्यक्रम ऑनलाइन पद्धतीने साजरे करण्याच्या सूचना यापूर्वी देण्यात आल्या आहेत. (जिथे प्रत्यक्षरीत्या कार्यक्रम करणे शक्य आहे, तिथे केंद्र शासन / राज्य शासन यांनी आखून दिलेल्या कोवीड मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.)

मराठीत पारंपारिक पद्धतीने प्रचार / प्रसार करण्याबरोबर त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन समाजमाध्यमांद्वारे अधिक प्रभावीपणे विविध कार्यक्रमाच्या माध्यमांचा प्रसार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासाठी **"समाजमाध्यमातून मराठीचा प्रचार / प्रसार"** ही मध्यवर्ती संकल्पना निश्चित करण्यात येत आहे.

१) **"समाजमाध्यमातून मराठीचा प्रचार / प्रसार"** ही यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. समाजमाध्यमांचा वापर करून प्रचार व प्रसाराकरिता विविध स्पर्धा योजणे, प्रसारमाध्यमांतून प्रचार करणे, पुस्तके व कोश यांबाबत चर्चा, परिसंवाद, व्याख्याने इत्यादी उपक्रम योजावेत.

२) मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन यासाठी विविध मार्गांनी स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या व्यक्ती / संस्था यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कार्याचा गौरव / सत्कार करणे.

३) यावर्षी कोविडची पार्श्वभूमी लक्षात घेता, तथा काळाची गरज लक्षात घेता, जास्तीत जास्त कार्यक्रम चर्चासत्रे, प्रशिक्षण ऑनलाइन पद्धतीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मराठी भाषेचा प्रचार, प्रसार या उद्दिष्टांसह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरूण पिढीला आकर्षित करण्यासाठी खालील विषयांवरील तसेच अशा स्वरूपाच्या अन्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१) अनुवादलेखन २) व्यावसायिक लेखन ३) पुस्तक निर्मिती व प्रकाशन प्रक्रिया ४) ई-बुक
५) स्व-प्रकाशन ६) युनिकोडचा वापर ७) ऑनलाईन पुस्तक विक्री ८)लेखक प्रकाशन करार
९) संहिता लेखन १०) विश्वकोशाबाबत माहिती कार्यशाळा ११) शॉर्ट फिल्म / डॉक्युमेंटरी लेखन

४) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व राज्य मराठी विकास संस्था यांनी वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या ऑनलाईन कार्यशाळांचे वेळापत्रक जाहिर करावे,

५) मराठीचा प्रचार / प्रसार ऑनलाईन पद्धतीने प्रभावीपणे कसा करता येईल या विषयावरील राज्य मराठी विकास संस्था व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी तज्ञांच्या ऑनलाइन कार्यशाळा आयोजित कराव्यात,

६) "ऑनलाइन पद्धतीने मराठीचा प्रचार / प्रसार व रोजगारनिर्मिती" या विषयावर राज्य मराठी विकास संस्थेने तज्ञ संस्थांकडून प्रकल्प अहवाल मागवावेत. प्रकल्प अहवालात संकल्पना, विषयाची माहिती, अंमलबजावणीचे टप्पे, खर्च इ. माहिती असावी. प्राप्त अहावालातून सर्वोत्कृष्ट तीन प्रकल्प अहवालाच्या आधारे संचालक, राज्य मराठी विकास संस्था यांनी ऑनलाइन कार्यक्रमांची आखणी करावी,

७) मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयांनी संकेतस्थळे, आकाशवाणी, दूरदर्शन, खाजगी दूरचित्रवाहिन्या, एफ.एम.रेडिओ, स्थानिक केबल नेटवर्क, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप इ. प्रसार माध्यमातून याबाबतचे दृक-श्राव्य संदेश प्रसारित करावेत,

८) मातृभाषेची महती आणि माहिती, तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रम आयोजित करावे,

९) सकस साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने राज्यभर कार्यक्रम आयोजित करावे,

१०) न्यायव्यवहार, शासन प्रशासन, प्रसार माध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने , चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे तसेच मराठी भाषेतून न्यायदान देण्याच्या कामास गती मिळावी यादृष्टीने विधी महाविद्यालयांनी “मराठी अभिमत न्यायालय”(Marathi Moot Court) च्या स्पर्धांचे आधुनिक माध्यमांचा वापर करून आयोजन करावे.

११) आकाशवाणी व दूरदर्शनवरुन सादर करण्यात येत असलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या प्रायोजित कार्यक्रमामध्ये मराठी भाषाविषयक मान्यवरांच्या मुलाखती, परिसंवाद आयोजित करणे,

१२) मराठी भाषा / साहित्य / कोश वाङ्मय या विषयांवर ऑनलाईन व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन तसेच तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात यावे,

१३) मराठीच्या प्रचार / प्रसारासाठी अभिनव कल्पना सादर करून त्याप्रमाणे ऑनलाइन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे,

१४) प्रसारमाध्यमे तसेच प्रशासनात मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन करणे,

१५) युनिकोडप्रणित मराठी आणि इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक संबंधित विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करणे,

१६) समाजप्रसार माध्यमांतील (सोशल मीडिया) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे यांचे आयोजन करणे,

१७) मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन करणे,

१८) बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन करणे (व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ.),

१९) शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती याबाबतच्या स्पर्धांचे आयोजन करणे,

२०) मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन करणे,

२१) मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या निःस्पृह व्यक्तींना आणि त्यांनी निर्माण केलेल्या संस्थाना किंवा प्रकल्पांना भेट देणे,

२२) मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन यासाठी विविध मार्गानी स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या व्यक्ती/ संस्था यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कार्याचा गौरव/ सत्कार करणे,

२३) विश्वकोश निर्मिती मंडळाच्या संकेतस्थळावर नोंदी घेण्याबाबतच्या कार्यशाळेचे आयोजन राज्य मराठी विकास संस्थेद्वारे करण्यात यावे,

२४) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार वर्जित प्रयोजने वगळता शासकीय कामकाज १००% मराठी भाषेतून करणे आवश्यक आहे. तर, त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये/सार्वजनिक उपक्रम यांनी मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे. याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश संबंधितांच्या निदर्शनास आणावे,

२५) भाषा संचालनालयाने व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या भ्रमणध्वनी उपयोजकाबद्दल (मोबाईल ॲप) तसेच मराठी भाषा विभागाच्या व त्या अंतर्गत कार्यालयांच्या संकेतस्थळाबद्दलची माहिती शाळा व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांपर्यंत प्रसारीत करण्याची जबाबदारी चारही क्षेत्रीय कार्यालयांची राहील,

२६) वरील कार्यक्रम सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी संस्कृती मंडळ तथा राज्य मराठी विकास संस्था यांनी खालीलप्रमाणे साहित्य संस्थांची मदत घेऊन त्या साहित्य संस्थांसमोर दर्शविलेलया जिल्ह्यात कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मदत घ्यावी

| अ.क्र. | साहित्य संस्था | साहित्य संस्थेच्या अंतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर. |
| २. | मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर. |
| ३. | विदर्भ साहित्य संघ, नागपूर | बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली |
| ४. | कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी | रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे, पालघर, मुंबई उपनगर, |
| ५. | दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर | कोल्हापूर |
| ६. | मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई. | मुंबई शहर |

सर्व जिल्हाधिकाऱ्यांना वरीलप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी भाषा संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि राज्य मराठी विकास संस्था, मुंबई तसेच **अ.क्र.२६** येथे दर्शविलेल्या साहित्य संस्थांची मदत घेता येईल.

२. सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपआपल्या विभागातील कार्यक्षेत्रातील संबंधितांचे सहकार्य घेऊन हा सोहळा पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सहभागी करुन घ्यावे.

३. सदर उपक्रमांकरीता होणारा खर्च, प्रत्येक वित्तीय वर्षात संबंधित लेखाशिर्षाखाली कार्यालयीन खर्चासाठी मंजूर होणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१०२१०११३१५४५९३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nanda Maruti Raut

Digitally signed by Nanda Maruti Raut
DN: CN = Nanda Maruti Raut, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Marathi Language Department
Date: 2021.02.11 14:48:22 +05'30'

**(नंदा मा. राऊत)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
४. मा.सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा.समिती प्रमुख व सदस्य, मराठी भाषा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
७. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
९. प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई,
१०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई, (दूरदर्शन / आकाशवाणी / वृत्तपत्रे / भित्तीपत्रके या माध्यमातून विस्तृत प्रसिध्दी देण्यासाठी),
१३. सर्व मंत्रालयीन विभाग (त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना सूचना देण्याबाबत),
१४. सर्व विभागीय आयुक्त,
१५. सर्व जिल्हाधिकारी,
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१७. भाषा संचालक, भाषा संचालनालय, बांद्रा, मुंबई,

१८. अध्यक्ष / सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
१९. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
२०. संचालक / प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
२१. मराठी भाषा विभाग / सर्व कार्यासने,
२२. निवड नस्ती (भाषा-३).